# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (पुणे मेट्रो रेल प्रकल्प )

---

## महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर सादरीकरण: पुणे महानगर प्रदेशासाठी तयार केलेली सर्वसमावेशक गतिशीलता योजना



महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने पुणे महानगर प्रदेशासाठी तयार केलेली सर्वसमावेशक गतिशीलता योजना (Comprehensive Mobility Plan) आज पुण्यातील 'यशदा' येथे झालेल्या बैठकीत महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या समोर मांडण्यात आला. या बैठकीसाठी उपमुख्यमंत्री आणि

पालकमंत्री श्री. अजित पवार, केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री श्री. मुरलीधर मोहोळ, तसेच उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री श्री. चंद्रकांत दादा पाटील हे उपस्थित होते.

महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. श्रावण हर्डीकर यांनी या सर्वसमावेशक गतिशीलता योजनेचे सादरीकरण केले. बैठकीचा मुख्य उद्देश एकात्मिक भू-वापर आणि वाढती वाहतूक व्यवस्था गतिशील व लोकाभिमुख करून पुणे महानगर प्रदेश बनविण्याच्या दीर्घकालीन ध्येयावर चर्चा करणे हा होता. पुढील ३० वर्षांसाठीचा हा आराखडा शाश्वत गतिशीलता, सुलभ वाहतूक पर्याय, मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब, कमी पर्यावरणीय समस्या आणि कमी खर्चात सार्वजनिक वाहतुकीचा प्रवास यावर लक्ष केंद्रित करतो. या योजनेचे उद्दिष्ट २०५४ पर्यंत सार्वजनिक वाहतुकीचा वापर ५०% पर्यंत वाढवणे आहे.

आराखड्यातील प्रमुख शिफारसी

सर्वसमावेशक गतिशीलता योजनेच्या प्रमुख शिफारसींमध्ये सध्या कार्यान्वित असलेल्या आणि बांधकाम सुरू असलेल्या मेट्रो जाळ्याव्यतिरिक्त आणखी ३१२ किलोमीटर मेट्रो आणि मेट्रो-लाईट मार्गिकांचा समावेश आहे. यात ८०.५ किलोमीटर नवीन बस रॅपिड ट्रान्सपोर्ट सिस्टीम (BRTS) मार्ग आणि ४६.३ किलोमीटर हाय फ्रिक्वेन्सी बस मार्गांचा प्रस्ताव आहे. प्रवासी संख्येची वाढती मागणी लक्षात घेता, पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (PMPML) च्या बस ताफ्यात नजीकच्या काळात ४,००० आणि २०५४ पर्यंत ११,५६४ बस समाविष्ट करण्याची शिफारस या आराखड्यात करण्यात आली आहे. यासोबतच ६४१ किलोमीटरचे नवीन बस मार्ग तयार करण्याचे सुचवण्यात आले आहे. तसेच, मेट्रो आणि बीआरटीएस मार्गांशी जुळणारे बस मार्ग कमी करण्यासाठी मार्ग तर्कसंगतीकरणाचा (route rationalization) प्रस्तावही दिला आहे.

या आराखड्यात सध्याच्या १२ पीएमपीएमल बस टर्मिनलचा पुनर्विकास आणि ११ नवीन टर्मिनलची निर्मिती, तसेच सध्याच्या ५ डेपोंचा पुनर्विकास आणि १५ नवीन डेपो तयार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. आंतर-शहर कनेक्टिव्हिटीसाठी, या अहवालात ७ आंतर-राज्य बस टर्मिनलचे (ISBTs) पुनर्विकास आणि ५ नवीन टर्मिनलचे बांधकाम सुचवले आहे.

रस्ते पायाभूत सुविधांमध्ये सुधारणांसाठी या आराखड्यात पुणे महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका परिसरात ५५२ किलोमीटरचे मिसींग लिंक, ४३८ किलोमीटर रस्त्यांचे रुंदीकरण, २९० किलोमीटरचे विविध वर्तुळाकार मार्ग (इनर, इंटरमीडिएट, आणि आउटर), १८ ग्रेड सेपरेटर (उड्डाणपूल), २० रेल्वे ओव्हर/अंडर ब्रिज (RoB/RuB) आणि १९ नदी वरील पुलांच्या बांधकामाचा प्रस्ताव आहे.

ग्रीन मोबिलिटी आणि इतर महत्त्वाचे घटक

ग्रीन मोबिलिटी आणि सक्रिय वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी, सीएमपी मध्ये पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये ३४१ किलोमीटर पादचारी मार्ग आणि २३० किलोमीटर सायकल मार्ग, तर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये २६६ किलोमीटर पादचारी मार्ग आणि १७० किलोमीटर सायकल मार्ग तयार करण्याची शिफारस केली आहे. महत्त्वाच्या १६ ठिकाणी पादचाऱ्यांसाठी ग्रेड-सेपरेटेड क्रॉसिंगची आवश्यकताही यात नमूद केली आहे.

लॉजिस्टिक्स आणि मालवाहतुकीसाठी, पुणे महानगर प्रदेशामध्ये १४ ट्रक टर्मिनल, ७ लॉजिस्टिक्स हब, आणि २६ मल्टी-मोडल ट्रान्सपोर्ट हब तयार करण्याचा प्रस्ताव आहे. प्रस्तावित पुरंदर विमानतळाला मेट्रो, भारतीय रेल्वे आणि रस्ते या तिन्ही सार्वजनिक वाहतुकीच्या जाळ्यामार्फत जोडण्याचे नियोजनही यात करण्यात आले

आहे.

सर्व शिफारसींच्या अंमलबजावणीसाठीचा एकूण अंदाजित खर्च सुमारे १.३३ लाख कोटी रुपये आहे, जो २०५४ पर्यंत तीन टप्प्यांत पूर्ण केला जाईल.

भागधारकांचा सहभाग

हा सर्वसमावेशक गतिशीलता आराखडा विविध भागधारकांशी सल्लामसलत करून तयार करण्यात आला आहे. यामध्ये पुणे महानगरपालिका (PMC), पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (PCMC), पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (PMRDA), राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI), पुणे शहर वाहतूक पोलीस, प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO), पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (PMPML), भारतीय विमानतळ प्राधिकरण (AAI), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC), तसेच अनेक नगरपालिका आणि कॅन्टोनमेंट बोर्ड यांचा समावेश आहे. याशिवाय, सर्व लोकप्रतिनिधी, शिक्षणतज्ञ, संशोधक, वाहतूक सल्लागार आणि ऑटोरिक्षा संघटनांसारख्या ऑपरेटर गटांसोबतही सल्लामसलत करण्यात आली.

आजच्या बैठकीला विभागीय आयुक्त, पुणे महानगरपालिका आयुक्त, महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त, पुणे शहर पोलीस आयुक्त, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे शहर वाहतूक पोलीस प्रमुख, पीएमपीएमएल अध्यक्ष, NHAI, AAI, PMRDA यांसारखे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. पुणे महानगर प्रदेशासाठी एकात्मिक, सर्वसमावेशक आणि भविष्यवेधी वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने ही बैठक एक महत्त्वाचे पाऊल ठरली.

ही सर्वसमावेशक गतिशीलता योजना सध्या राज्य सरकारच्या मान्यतेच्या प्रतीक्षेत आहे आणि आजच्या बैठकीमुळे त्याच्या लवकर मंजुरीचा मार्ग मोकळा झाला आहे.

